| MHNS130005082017 | | | |
|---|---|---|---|
| | दाखल तारीख | : | ०८/०६/२०१७ |
| | नोंद तारीख | : | ०८/०६/२०१७ |
| | निकाल तारीख | : | **०६/०५/२०२६** |
| | कालावधी | : | **व. म. दि.**<br>**०८ १० २९** |

| **पिंपळगांव (बसवंत) येथील प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी, तालुका निफाड,जिल्हा नाशिक यांचे न्यायालयात.** |
|---|
| **(पिठासीन अधिकारी पी.डी.कोळेकर)** |

**संक्षिप्त फौजदारी खटला क्रमांक २२९/२०१७** **निशाणी क्रमांक १० लगत**
(पोलीस ठाणे, पिंपळगाव (ब.) गुन्हा नोंद क्रमांक १७९/२०१५)

**भाग "अ"**

| | | |
|---|---|---|
| अभियोजन पक्ष | | **महाराष्ट्र शासन,**<br>मार्फत – अधिकारी, पोलीस ठाणे,पिंपळगांव(ब.),<br>ता. निफाड, जि. नाशिक. |
| अभियोग पक्षातर्फे विधीज्ञ | | विशेष सहायक सरकारी अभियोक्ता **श्री. एस.एल.जोरवर** |
| | | ***विरुध्द*** |
| आरोपी | | **सुरेश डब्बुराम राठोड,**<br>वय – ५१ वर्षे,<br>रा. शिवाजीनगर, उल्हासनगर, जि. ठाणे. |
| आरोपीतर्फे विधीज्ञ | | **श्री. आर.टी.चव्हाण** |

## भाग "ब"

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | २३/१२/२०१५ |
| गुन्हा दाखल दिनांक | २६/१२/२०१५ |
| दोषारोपपत्र दाखल दिनांक | ०८/०६/२०१७ |
| दोषारोप तयार केल्याचा दिनांक | ०७/०८/२०१७ |
| पुरावा सुरु केल्याचा दिनांक | २८/०७/२०२२ |
| न्यायनिर्णयास ठेवल्याचा दिनांक | ०६/०५/२०२६ |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | ०६/०५/२०२६ |
| दोषी ठरल्याचा दिनांक, जर असल्यास | -- |

## आरोपींची सविस्तर माहिती

| आरोपीचे नांव | अटक केल्याचा दिनांक | जामीनावर सोडल्याचा दिनांक | दोषारोप कलम | निर्दोष अथवा दोषी | शिक्षा दिली असल्यास किती | न्यायालयीन बंदी कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| **सुरेश डब्बुराम राठोड** | २८/१२/२०१५ | १०/०१/२०१५ | **भा. दं. वि. कलम २७९, ३३७ व मो.वा.का.क.१ १८४ प्रमाणे** | **निर्दोष** | - | - |

## भाग "क"

**अभियोजन /आरोपीतर्फे/ न्यायालयीन साक्षीदार यांची यादी**

**अ. अभियोजन पक्षातर्फे साक्षीदार**

| साक्षीदार | नांव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| सा. क्र.०१ | **प्रभाकर बाबुराव खांदवे,** (नि.क्र.१० लगत) | फिर्यादी |

## ब. आरोपीतर्फे साक्षीदार

| साक्षीदार क्र. | नांव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| निरंक | | |

## क. न्यायालयीन साक्षीदार

| साक्षीदार क्र. | नांव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| निरंक | | |

## अभियोजन पक्ष/आरोपी/न्यायालयीन पुराव्यांची यादी

## अ. अभियोजन पक्षाचा पुरावा

| **निशाणी क्र.** | **कागदपत्रांचे वर्णन** |
|---|---|
| १८ | मोटार अपघात खबर |
| १९ | घटनाठिकाण पंचनामा |
| २० | फिर्याद |
| २१ | वाहन तपासणीबाबत परिवहन विभाग पिंपळगांव ब. यांना दिलेले पत्र |
| २२ | मोटार वाहन कायदा कलम २०९ प्रमाणे नोटीस |
| २३ | वैद्यकीय अधिकारी यांना दिलेले पत्र |

## ब. आरोपीतर्फे पुरावा

| निशाणी क्र. | नांव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| निरंक | | |

## क. न्यायालयीन पुरावा

| निशाणी क्र. | नांव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| निरंक | | |

## ड. मुद्देमाल

| अ.क्र. | मुद्देमाल क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| | निरंक | |

## न्यायनिर्णय
## (घोषित दिनांकः ०६/०५/२०२६)

आरोपी विरुद्ध **भारतीय दंड संहिता कलम २७९, ३३७ व मोटार वाहन १८४** अन्वये खटला चालवण्यात आला.

**अभियोग पक्षाचे संक्षिप्त कथन खालीलप्रमाणेः–**

२. फिर्यादी करण प्रभाकर बाबुराव खांदवे करतात की, दिनांक २३/१२/२०१५ रोजी ते पिंपळगांव ब. पोलीस ठाणे येथे ठाणे अंमलदार म्हणुन कार्यरत असतांना १८.३० वाजताच्या सुमारास एका अज्ञात इसमाने त्यांना फोनवरुन खबर दिली की, शिरवाडे फाटयावर एक ट्रक व ट्रॅव्हल्स टेंम्पो यांचा अपघात झालेला आहे. अपघातात दोन्ही वाहनांचे नुकसान झाले असल्याबाबत त्यांनी अपघात खबर क्र.५४/२०२५ नोंदवली. सदर अपघाताच्या चौकशीदरम्यान, घटनास्थळाच्या परिस्थीतीवरुन व साक्षीदारांच्या सांगण्यावरुन टेंम्पो ट्रॅव्हल्स गाडी क्र. एम.एच.१५–ए.के.४७२ या वाहनाचा चालक आरोपी सुरेश डब्बुराम राठोड याने पिंपळगांवकडुन चांदवडकडे घेवुन जात असतांना शिरवाडेवणी फाटयावर हयगयीने, अविचाराने, भरधाव

वेगात चालवुन रोडकडे न पाहता चांदवड बाजुकडुन वळण घेवुन चांदवड बाजुकडुन येणारी ट्रक क्र. एम.एच.–०४–सी.पी.–५७८६ हिस समोरुन ठोस मारुन अपघात करुन अपघातात दोन्ही वाहनांचे नुकसान केले. सबब, फिर्यादी यांनी पिंपळगांव ब. पोलीस ठाणे येथे फिर्याद दाखल केली.

३. अभियोग पक्षाने दिलेला साक्षीपुरावा व बचावपक्षाचा बचाव लक्षात घेतल्यानंतर खालील मुद्दे न्यायनिर्णयाकरिता उपस्थित केले असुन त्यावरील निष्कर्ष कारणांसहीत खालीलप्रमाणे दिले आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दिनांक २३/१२/२०१५ रोजी संध्याकाळी ६.३० वाजेच्या सुमारास काशीभोज शिरवाडे शिवार, मुंबई–आग्रा रोड, ता.निफाड, जि.नाशिक येथे आरोपीने त्याच्या ताब्यातील वाहन टेम्पो नोंदणी क्र. एम.एच.१५–ए.के.–४७२ हे सार्वजनिक रस्त्यावर मानवी जिवित धोक्यात येईल अथवा व्यक्तीला दुखापत अगर नुकसान पोहोचण्याचा संभव होईल इतक्या बेदरकारपणे चालवुन ट्रक क्र. एम.एच.–०४–सी.डी.–५७८६ ला धडक देवुन **भारतीय दंड संहिता कलम २७९ अन्वये** अपराध केला हे अभियोग पक्ष सिध्द करतो काय ? | **नकारार्थी.** |

| | | |
|---|---|---|
| २. | वर नमुद दिवशी, वेळी आणि ठिकाणी, आरोपी यांनी त्याच्या ताब्यातील वर नमुद वाहन हे मानवी जिवीत किंवा इतरांचे व्यक्तीगत सुरक्षा धोक्यात येईल इतक्या बेदरकारपणे अथवा हयगयीने चालवुन **भारतीय दंड संहिता कलम ३३७ अन्वये** अपराध केला हे अभियोग पक्ष सिध्द करतो काय ? | **नकारार्थी.** |
| ३. | वर नमुद दिवशी,वेळी आणि ठिकाणी, आरोपी यांनी त्याच्या ताब्यातील वर नमुद वाहन हे जनतेला धोकादायक ठरेल अशा वेगाने चालविले आणि जेथे वाहन चालविले त्या जागेचे स्वरुप, स्थीती व वापर आणि त्यावेळी जितकी वाहतुक प्रत्यक्षपणे होती त्याचे प्रमाण याबाबतच्या परीस्थीतीकडे दुर्लक्ष करुन **भारतीय दंड संहिता कलम १८४ अन्वये** अपराध केला हे अभियोग पक्ष सिध्द करतो काय ? | **नकारार्थी.** |
| ४. | अंतिम आदेश काय? | **आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येते.** |

## पुरावा

४. अभियोग पक्षाने आरोपीविरुध्द ठेवलेले आरोप सिध्द करण्यारिता फिर्यादी प्रभाकर बाबुराव खांदवे (अ.सा.क्र.१) यांना नि.क्र.१० लगत तपासले आहे.

## कारणमिमांसाः

**मुद्दा क्र. १ ते ३ करिताः**

५. मुद्दे क्र.१ ते ३ ची कारणमिमांसा आणि विश्लेषण परस्पर निगडीत असल्याने पुनरावृत्ती टाळण्याकरिता त्यांची कारणमिमांसा एकत्रीत घेतली आहे. आरोपीविरुध्द लादण्यात आलेले आरोप हे अभियोगपक्षाने संशयापलीकडे जावून

निर्विवाद सिध्द करणे आवश्यक आहे.

६. प्रस्तुत प्रकरणातील फिर्यादी प्रभाकर खांदवे (अ.सा.क्र.१) यांनी त्यांच्या सरतपासात कथन केले आहे की, दिनांक २३/१२/२०१५ रोजी ते पिंपळगांव ब. पोलीस स्टेशन येथे ठाणे अंमलदार म्हणुन १४.०० ते २०.०० या कालावधीत कार्यरत होते. त्यादिवशी अज्ञात इसमाने त्यांना फोन करुन कळवले की, शिरवाडे फाटयावर एक ट्रक व टेंम्पोचा अपघात झाल आहे. त्यानुसार त्यांनी अपघात क्र.५४/२०१५ नि.क्र.१८ नोंदवली. त्यानंतर त्यांनी घटनास्थळावर दोन पंचांसमक्ष जावुन घटनास्थळ पंचनामा नि.क्र.१९ तयार केला व साक्षीदारांचे जबाब नोंदवुन फिर्याद नि.क्र.२० नोंदवली. तसेच त्यांनी वाहन तपासणीबाबत परिवहन विभाग पिंपळगांव ब. यांचेकडे पत्र नि.क्र.२१ देवुन आरोपीला मोटार वाहन कायदयाचे कलम २०९ प्रमाणे नोटीस नि.क्र.२२ दिली. जखमींचे वैद्यकीय प्रमाणपत्र हस्तगत करुन वैद्यकीय अधिकारी, सेंटर हॉस्पीटल, उल्हासनगर यांना पत्र नि.क्र.२३ दिले. त्यांच्या तपासादरम्यान असे निष्पन्न झाले की, आरोपीने त्याचे ताब्यातील वाहनचे क्लिनर बाजुने चांदवड बाजुकडुन येणा–या ट्रकला समोरुन धडक दिली व सदर अपघात आरोपीच्या चुकीमुळे घडला होता. सदर अपघातात दिपक मोरे यांना दुखापत झाली होती.

७. प्रभाकर खांदवे (अ.सा.क्र.१) यांनी त्यांच्या उलटतपासात मान्य व कबुल केले की, घटनास्थळ शिरवाडे फाटा हे महामार्गावरील चौफुलीचे ठिकाण असुन सदर चौफुलीवरुन पुर्वेकडील रस्ता शिरवाडेवणीकडे जातो व पश्चिमेकडील रस्ता वडनेरभैरवकडे जातो. घटनास्थळावरील महामार्गावर डिव्हायडर असल्याने जाणा–या

येणा–या वाहनांसाठी स्वतंत्र लेन आहे. सदर अपघाताची खबर देणा–या अज्ञात इसमाबाबत त्यांनी तपास केला नाही. त्यांनी अपघात प्रत्यक्ष पाहिलेला नाही.

८. प्रभाकर खांदवे (अ.सा.क्र.१) यांच्या तोंडी पुराव्याचे अवलोकन करता त्यांनी त्यांच्या उलटतपासात मान्य व कबुल केले आहे की, सदर अपघात त्यांनी प्रत्यक्ष पाहिलेला नाही. प्रभाकर खांदवे (अ.सा.क्र.१) यांनी आरोपीने त्याच्या ताब्यातील वाहन हयगयीने, अतिवेगात, निष्काळजीपणे चालवुन अपघात केला असे कोणतेही कथन केले नाही. त्यामुळे अपघात आरोपीच्याच चुकीमुळे झाला हे शाबीत होत नाही. तसेच अभियोग पक्षाने पंच साक्षीदार, जखमी व प्रत्यक्षदर्शी साक्षीदार यांची साक्ष अभिलेखावर आणलेली नाही. त्यामुळे आरोपीने त्याच्या ताब्यातील मोटारसायकल सार्वजनीक रस्त्यावर हयगयीने, निष्काळजीपणे, रस्त्याच्या परिस्थतीकडे दुर्लक्ष करुन, जखमींना दुखापत केली असा कोणताही पुरावा पटलावर उपलब्ध नाही.

९. सबब एकंदरीत असे दिसुन येत आहे की, आरोपीविरुध्दचे आरोप सिध्द होण्याकरिता कोणताही सबळ पुरावा अभिलेखावर नाही. त्यामुळे आरोपीविरुध्द लादण्यात आलेले आरोप हे संशयाच्या भोवऱ्यामध्ये सापडतात. सबब संशयाचा फायदा आरोपीला देणे याठिकाणी क्रमप्राप्त ठरत आहे. त्यामुळे मी मुद्दे क्र.१ ते ३ चे उत्तर नकारार्थी देत आहे.

**मुद्दा क्र. ४ करिताः**

१०. मुद्दे क्र.१ ते ३ च्या उत्तरादाखल करण्यात आलेल्या विवेचनावरुन असे

दिसुन येते की, आरोपीविरुध्द लादण्यात आलेले आरोप अभियोगपक्षाने संशयापलीकडे जावून सिध्द केलेले नाही. सबब आरोपी त्याच्यावरील आरोपातून निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. सबब मी मुद्दा क्र.४ च्या उत्तरादाखल खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. आरोपी **सुरेश डब्बुराम राठोड** याची भारतीय दंड विधान कायदा **कलम २७९, ३३७, मो. वा. का. कलम १८४ नुसार** गुन्हा केल्याचे आरोपांतून, फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ च्या कलम २५५ (१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ अन्वये आरोपीने १५०००/- रुपयांचा जामीन व जामीन कदबा दयावा.

३ आरोपीचे जामीन बंधपत्र रद्द करण्यात येत आहे.

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर केले.)**

KOLEKAR PRASAD DIPAK
Digitally signed by KOLEKAR PRASAD DIPAK
Date: 2026.05.06 13:47:09 +0530

**(पी. डी. कोळेकर)**
**न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,**
**पिंपळगांव (बसवंत)**

**दिनांकः–०६/०५/२०२६**